महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४९ वा | दिनांक : ०८/०३/२०२५ | वार : शनिवार

# कारागृह विभागात ५०० कोटींचा घोटाळा



**पुणे** : राज्यातील काराग्रहामध्ये सन २०२३ ते २०२५ या वर्षामध्ये रेशन, कॅन्टीन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये जवळपास ५०० कोटी रूपयाहून अधिक रक्कमेचा घोटाळा झाला नसल्याचा व माझ्या काळातील खरेदी नसल्याचे स्पष्टीकरण तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी हे धांदात खोटे आहे.

अमिताभ गुप्ता हे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२४ या काळात अप्पर पोलिस महासंचालक काराग्रह विभाग पुणे येथे कार्यरत होते. अमिताभ गुप्ता यांच्याच काळात कारागृहात अनेक उपकरणांचे खरेदी झाली असून त्यामधील घोटाळ्याची चौकशी पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली.

राज्यातील काराग्रहातील घोटाळ्याबाबत काल झालेल्या पत्रकार परिषदेनंतर तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता माझ्या काळातील खरेदी झाले नसल्याचे तर पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी शासनाच्या नियमानुसार खरेदी झाले असल्याचा खुलासा केला आहे. दोन्ही अधिका-यांनी सारवासारव केली असून याबाबत सर्व पुराव्यानिशी माहिती काल पत्रकार परिषदेत दिली असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

अमिताभ गुप्ता यांनी त्यांच्या काळात अनेक उपकरणे खरेदी केली आहेत. सदरची खरेदी जीएम वरून करत असताना त्या वस्तूंचा त्यावेळचा बाजारातील दर व काराग्रह विभागाने खरेदी केलेले दरामध्ये मोठी तफावत आहे. उदा, ३० केव्ही जनरेटरची बाजारातील किंमत ५ लाख ४० हजार असताना काराग्रहाने ९ लाख ९० हजार रूपयास खरेदी केली आहे. HP चे लेसर प्रिंटर ३० हजाराची बाजारात किंमत असून ४९ हजार २२० रूपयांनी खरेदी केली आहे. अमिताभ गुप्ता यांनीच काही मर्जीतल्या ठेकेदारांमार्फत खरेदी करता यावा याकरिता २७ मार्च २०२४ रोजी केंद्रीय पध्दतीने निविदा करण्याची मागणी शासनाकडे मागणी केली होती.

यामुळे सदरच्या भ्रष्ट्राचाराची चौकशी सखोल होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याची गरज असून याबाबत पुढील आठवड्यात मुख्यमंत्री, मुख्य सचिव व गृह सचिव यांना भेटून सदरची चौकशी समिती नेमण्याची मागणी करणार आहे.जर खरोखरच काराग्रह विभागात भ्रष्ट्राचार झाला नसेल तर दोन्ही अधिकारी जी वेळ देतील तेंव्हा माध्यमांच्यासमोर त्यावेळचे काराग्रहाने खरेदी केलेले दर व त्या वस्तुंचे त्याकाळातील बाजारातील दरपत्रक पुन्हा एकदा सादर करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

# जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभरात विशेष ग्रामसभा



**मुंबई** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत ८ मार्च रोजी राज्यभरातील सर्व ग्रामपंचयातींमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहे. या विशेष ग्राम सभेतून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संकल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे तसेच महिला सुरक्षिततेसाठीचा ठराव या ग्रामसभांमध्ये करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने या विशेष सभेची मागणी केली होती. महिला आयोगाच्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश दिनांक ६ मार्च रोजी पत्राद्वारे दिले आहेत. या प्रकरणी महिला आयोगाच्या रूपाली चाकणकर यांनी माहिती दिली आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, विधवा महिलांना रूढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागत आहे. या सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होऊ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणाऱ्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे असे ठराव करण्यात यावे अशी आयोगाची संकल्पना आहे. पुढे बोलताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, संपूर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांची वागणूक देत त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अशा प्रयत्नांमधून बदलेल म्हणून आयोगाने अशी संकल्पना मांडली आहे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विशेष ग्रामसभा आयोजित केल्याबद्दल रूपाली चाकणकर यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचे आभार मानले आहेत. तसेच राज्यात पहिल्यांदाच महिलांच्या विषयांकरिता विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा मैलाचा दगड असल्याचेही चाकणकर म्हणाल्या. केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाच्या अप्पर सचिवांनी देशातील सर्व राज्यातील ग्रामविकास सचिवांना दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

# आत्मनिर्भरता आणि पर्यावरण संरक्षणात महिलांची भूमिका महत्त्वाची : डॉ. विनीता आपटे



**पुणे** : प्रत्येक देशाला दोन पंख असतात ,एक स्त्री आणि एक पुरुष. साहजिकच देशाची उन्नती व्हायची असेल तर दोन्ही पंखांचा सन्मान होणं गरजेचं आहे. महिला आघाडीवर नाहीत असं आज एकही क्षेत्र नाही. अशा महिलांनी इतरही महिलांना सक्षम बनवणं ही खरी गरज आहे.

सार्वजनिक क्षेत्रात काम करणा-या यशस्वी महिलाना पुरुषी अहंकाराचा सामना करावाच लागतो .त्या शिवाय महिला सहकारीपण अनेकदा दुस्वास करतात व त्यामूळे महिलांना दोन्ही आघाड्यांवर शत्रू निर्माण होतात. सकारात्मक वृत्ती, खंबीरपणे निर्णय घेण्याची क्षमता या गोष्टी महिलांनी आत्मसात कराव्यात. कुठल्याही प्रलोभनांना बळी न पडता आपला स्वत:चा आत्मसन्मान जपावा व आत्मनिर्भर व्हावे असे मत तेर पॉलिसी सेंटरच्या संस्थापक डॉ. विनीता आपटे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे.

डॉ.आपटे म्हणाल्या, मी पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या अनेक महिला बघत असते.आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या महिला खुप जास्त आहेत. वन खात्यासारख्या पुरुषप्रधान क्षेत्रात महिला आपला वेगळा ठसा उमटवत आहेत याचा विशेष अभिमान वाटतो. कचरा व्यवस्थापन करण्यात महिलाच आघाडीवर असतात. पृथ्वीवरचं पर्यावरण वाचवायचं असेल तर महिलांचे योगदान महत्वाचे आहे. पाण्याची बचत, विजेची बचत व स्वच्छता यासारख्या गोष्टी महिलाच प्रभावी पद्धतीने करु शकतात.निसर्गाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी केवळ झाडे लावणे पुरेसे नाही तर त्यांचे जतन तेवढेच आवश्यक आहे,पर्यावरणाबाबत आस्था असलेल्यांची संख्या लक्षणीय आहे, मात्र त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड देणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. हे चित्र बदलण्यासाठी मध्ये जागतिक स्तरावरील पर्यावरण विषयक लेखन झाडे, त्यांचे अधिवास यांबाबत भरपूर माहिती महिलांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

आपण शेतीवर ,जंगलावर , पाण्यावर आणि स्वच्छ हवेवर अवलंबून आहोत. भविष्यात ते आपलयाला मिळणार नाही,असे संशोधन आहे.याची काळजी वाटते. पृथ्वीचे भवितव्य आपल्या हाती सुरक्षित असेल हे पाहणे आपली जबाबदारी आहे.ती प्रदूषित होणार नाही,हे पाहणे प्रत्येकाची जबाबदारी आहे.पर्यावरण विषयक आस्थेला कृतीची जोड मिळणे आवश्यक आहे.पृथ्वी म्हणजे वसुंधरा - या नावाकडे मातृप्रमाणे आपण पाहतो.त्यामुळे महिला दिनी आपली जबाबदारी वाढते.'तेर' हे फ्रेंच नाव वसुंधरा या अर्थाचे आहे,म्हणून तेर पॉलिसी सेंटर या आमच्या संस्थेने ते स्वीकारले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ मार्च २०२५


## परीक्षांचे वेळापत्रक ठरविण्याचे नियोजन शाळा स्तरावरच असावे - शिक्षक समिती

**कन्नड (अरुण थोरात):** राज्यातील सर्व शाळांमध्ये इ. १ ली ते ९ वी इयत्तांसाठी वार्षिक परीक्षा संकलित मूल्यमापन, पी.ए.टी. चाचण्यांचे आयोजन एकाच वेळी करणेचे पत्र निर्गत झाले आहे. त्यानुसार दि. ८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान परीक्षा/चाचण्या घेण्याचे नमूद आहे.

प्रचलित पद्धतीनुसार चाचणी परीक्षा आयोजित करणे, हे शाळा स्तरावरचे नियोजन असते. वाढता उष्मा, शाळेतील भौतिक सुविधा, शिक्षक-विद्यार्थी संख्या, उत्तरपत्रिका तपासणे, गुणतक्ते तयार करणे, संकलित, वार्षिक परीक्षा नोंदवहीत निकाल नोंदविणे, विद्यार्थीनिहाय स्वतंत्र गुणपत्रक भरणे, नामवर प्रमोशन नोंदी घेणे आणि इयत्ता अखेर शाळेतून बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे दाखले तयार करणे आणि महाराष्ट्र दिनी (१ मे) निकाल जाहीर करणे आदी परीक्षा विषयक कामे असतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ७५ टक्के पेक्षा अधिक प्राथमिक शाळांत स्वतंत्र मुख्याध्यापक नाही. मुख्याध्यापक आणि शिक्षकांकडे एकापेक्षा अधिक वर्गाचे अध्यापन असून परीक्षेचे सर्व कामकाज त्यांनाच बघावे लागते.आरटीई मधील तरतुदीनुसार चाचण्या घेण्याचे नियोजन हे संबंधित शाळेकडेच आहे. सोबतच इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचा शाळा पूर्वतयारी मेळावा एप्रिल मध्येच घ्यावा लागतो.

वाढत्या उन्हासोबतच पाण्याचे दुर्भिक्ष आणि वीज पुरवठा खंडित होणे इत्यादी कारणांमुळे विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये या उद्देशानेच दि. १५ एप्रिलपर्यंत परीक्षांचे आयोजन केले जाते. वरील वास्तव लक्षत घेता दि. २५ एप्रिल पर्यंत परीक्षा घेण्याचे वेळापत्रक कोणत्याही दृष्टीने सुसंगत नसल्याने संदर्भित आदेश रद्द करून प्रचलित पद्धतीनुसार परीक्षांचे वेळापत्रक ठरविण्याचे नियोजन शाळा स्तरावरच असावे अशा मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगांवकर, यांच्या कडून सचिन्द्र प्रतापसिंग, राज्य आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे वराहुल रेखावार संचालक (SCERT - महाराष्ट्र), पुणे शरद गोसावी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे मराठवाडा विभागीय प्रसिध्दीप्रमुख सतीश कोळी यांनी कळविले आहे.

यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष विजय साळकर, सरचिटणीस रंजित राठोड, राज्य प्रवक्ते नितीन नवले, मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्याम राजपूत, संघटक शालिकराम खिस्ते आदी उपस्थित होते.




## अंजना स्कूल ऑफ एक्सलेंस येथे महिला दिनी कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** आसेगाव येथिल अंजना प्रतिष्ठानच्या सौं.मोनिका स्वर्णजित पल्हाळ यांच्या मार्गदर्शना खाली आठ मार्च जागतिक महिलां दिनी खेळ पैठणीचा होम मिनिस्टर मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन.तसेच पैठणी, चांदीचे नाने, सोन्याची नथ जिंकण्याची महिलांना सुवर्ण संधी व कार्य कर्तृत्ववान महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

शनिवारी, सायंकाळी चार ते सात या वेळेत हा कार्यक्रम आसेगाव तळेसमान येथिल अंजना शाळेत होणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून शासकीय वैध्यकीय महाविद्यालयांच्या माजी अधिष्ठाता स्त्री, बालरोग तज्ञ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. कानन येळीकर, माजी प्राचार्य डॉ. सी एस पाटील,दौलताबाद पोलीस स्टेशन च्या पोलीस निरीक्षक रेखा लोंढे,गंगापूर तालुका क्रीडा अधिकारी लता लोंढे, राष्ट्रीय कब्बडी खेळाडू सौं.स्मिता पल्हाळ,आसेगाव सरपंच सविता दिपक राजगुरू, उद्योजीका दिव्या मराठे आदिंची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे मराठवाड्यातील ग्रामीण भागात करण्यात येत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदाना बद्दल अंजना प्रतिष्ठानला भारत सरकार च्या विज्ञान व औदयोगिक राष्ट्रीय तंत्रज्ञान मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर संशोधक संस्थेचे आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ डॉ.रवी मोरो आणि श्री राजेंद्र येंगडे यांच्या हस्ते राष्ट्रीय सन्मान केला जाणार आहे.

तसेच महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेला "चांडाळ चौकडीच्या करामती" फेम मराठी अभिनेते रामभाऊ जगताप यांचा होम मिनिस्टर खेळ पैठणी चा मनोरंजनपर कार्यक्रम आयोजित कारण्यात आलेला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमात परिसरातील निवड समितीने निवड केलेल्या कर्तृत्ववान महिलांचाही सन्मान प्रमुख मान्यवारांच्या हस्ते करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजना स्कूल ऑफ एक्सेलेंस च्या प्राचार्या स्नेहा पवार व इतिहास अभ्यासक प्रा. डॉ.शिवाजी गायकवाड हे करणार आहे.

## पावर पाईंट प्रेझेंटेशनच्या (PPT) माध्यमातून विविध विषय तज्ञांची ओळख



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इ. भा. पाठक महिला कला महाविद्यालयात रीसर्च क्लब तर्फे दि. ०५ मार्च २०२५ बुधवार रोजी पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आली. आजच्या स्पर्धात्मक युगात नुसतं परसेंटेज महत्त्वाचे नसून, आपल्याला माहीत असलेले ज्ञान, आपली मतं, ठराविक वेळेत प्रभावीपणे विद्यार्थ्यांना मांडता आली पाहिजेत, या विशिष्ट उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती.

या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य असे होते की, सामान्यतः पीपीटी प्रेसेंटेशन म्हटल्यावर एखादा विषय घेऊन त्याचे सादरीकरण करणे होय. पण या स्पर्धेची संकल्पना अशी होती की Brilliant Minds Boundless Insight (ब्रिलियन्ट माईंड्स बाउंड लेस इनसाईट ) या शीर्षकाअंतर्गत विविध विषयातील तज्ञ व्यक्तींची ओळख, त्यांचे योगदान, त्यांनी लिहिलेली पुस्तके यांचा थोडक्यात आढावा पाच ते सात मिनिटात घ्यायचा होता. महाविद्यालयातील एकूण १४ विभागातील विद्यार्थिनींनी यात सहभाग नोंदविला.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मराठी विषयातील साहित्यिक, मानसशास्त्रातील मानसशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रातील अर्थशास्त्रज्ञ, संस्कृतमधील पंडित, गृहशास्त्रातील आहारतज्ञ, संगणक विभागातील संगणकात योगदान देणारे महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व, अशा विविध विषयातील तज्ञांचा परिचय झाला.

या स्पर्धेला परीक्षक म्हणून विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रा. आराधना टाकळकर - केवडकर लाभल्या होत्या. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मानसशास्त्र विभागातील सफल्या धानोरकर व वेदिका खरे यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक बीसीए विभागातील आकांक्षा वर्मा, शेख रिझा, खान नविस्ता यांनी मिळविला. तृतीय क्रमांक क्रीडा विभागातील खुशाली मधेकर आणि फाल्गुनी गोरमे यांनी प्राप्त केला.

या स्पर्धेला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनिता बाजपेयी यांनी शुभेच्छा व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले. या स्पर्धेचे आयोजन रिसर्च क्लब इन्चार्ज प्रो.डॉ. रजनी सेनाड यांनी केले ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अत्यंत मोलाचे सहकार्य प्रा. डॉ. सविता मनोहर व प्रा. डॉ. अंजली पंडित यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ मार्च २०२५


# प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा







**येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलनाप्रसंगी नृत्य सादर करताना बालकलाकार**

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव, पोलीस उपनिरीक्षक नवनाथ गाडेकर ,प्राचार्य अशोक सपाटे, सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर लोहिया, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर, प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर, संगमेश्वर लामजने, धनराज हाळळे, मुख्याध्यापिका अनुराधा जोशी आदींचे प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर आपले कलाविष्कार यावेळी सादर केले.

मराठी-हिंदीबालगीते, लावणी, लोकगीते, भरतनाट्यम्, कोळीगीते, लेझीम, आदिवासी नृत्य, पंढरपूरची वारी, टिपरी, देशभक्तीपर गीतांवर नृत्य, रिमिक्स गाणी, विविध वेशभूषा सादर करून शाळेतील विद्यार्थ्यांनी जल्लोष साजरा केला.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक विरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळ, पंकज पाताळे, सागर मंडले, सहशिक्षिका संगीता देशमुख, नेहा माने, अश्विनी क्षीरसागर, शितल घोडके, तनुजा जमादार, प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, सोनाली कारभारी, सुधाराणी शेळके, श्रीदेवी मंडले, पुजा मरबे, इंदिरा व्हट्टे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहशिक्षक जगदीश सुरवसे, विदयार्थी समृद्धी खददे, वेदीका मुर्डे, धानेश्वरी धनुरे तर दृष्टी चौधरी आभार यांनी मानले.

यावेळी शहर व परिसरातील पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गोरक्षनाथ महाराज पालखी सोहळा संपन्न



**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव नाथांचे येथे दि.२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री ला श्री गोरक्षनाथ महाराज महाभिषेक करुन यात्रेस प्रारंभ झाला.यात्रे निमित्त मंदिर परिसरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यात्रा काळात मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशोकराव भाले यांनी पौरोहित्य केले महेश कुलकर्णी यांच्या हस्ते आरती करण्यात आली.१ मार्च रोजी जंगी कुस्ती चा आखाडा मोठ्या उत्साहात पार पडला.

दि. ०४ मार्च मंगळवार रोजी रात्री ९.०० वाजता ग्रामदैवत श्री गोरक्षनाथ महाराज यांची पालखी निघाली. या वेळी गावातील भाविकांनी आपल्या घरासमोर रांगोळी काढली. गोविंदा, गोरक्षनाथ महाराज कि जय च्या गर्जनेने परिसरात वातावरण भक्तिमय बनले.

भजनी मंडळी नी अभंग, भारुड, गवळणी सादर केल्या. व्यवसाय निमित्त बाहेर गावी असलेले गावातील नागरिक या वेळी गावात दाखल होतात. आरती करुन पालखी सोहळ्याची सांगता झाली. या वेळी जिल्हाभरातुन भाविक भक्त दाखल झाले होते. गोरक्षनाथ उत्सव समिती, भजनी मंडळ, सर्व गावकऱ्यांनी उपस्थिती होती





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ मार्च २०२५

# कॅनव्हास .. तिच्या जगण्याचा ...

ती .. कधिकाळची एक स्वतंत्र मुलगी
नदीसारखी झुळझुळ वाहणारी ..

ती .. तिच्याच आयुष्याची सुंदर परी
स्वप्नांना अलगद कुरवळणारी ..
मनातल्या मोरपिसांना .. हळुवार फुलवणारी ..

ती .. एक लेक कर्तबगार ..
आई वडिलांच्या संस्कारांना अखंड जपणारी ..
जग कितीही उलट वागलं ,
तरी प्रेमानं ती मात्र कायम सरळ वागणारी ...

ती .. राणी तिच्या स्वप्नातल्या राजाची
कुठलाच अनुभव नसताना ,
घर - संसाराचा हिशेब मात्र चोख सांभाळणारी ..

ती .. प्रेमळ आई आपल्या लेकराला जीवापाड जपणारी
सुख भरभरून वाटणारी ...
मात्र दु:ख कायम आतल्या आत पिऊन घेणारी ..

पापण्यांच्या पल्याड सारं जग सामावून घेणाऱ्या ,
सतत कार्यमग्न असणाऱ्या ' ती ' चा हा प्रवास कधीच संपत नाही ..

असंख्य रेषा-रेघोट्याच्या नि रंगछटांच्या साह्याने ती आपला कॅनव्हास
सतत रंगवत राहते ..सतत...अगदी सुबकतेने

**कवयित्री- कस्तुरी संतोष कुलकर्णी**
छत्रपती संभाजीनगर.
९५९५८६०५७०



"कधी जिंकणे कधी हारणे तुलाच जमते
संकटातही ना डगमगणे तुलाच जमते

बापाची तू परी लाडकी घरात असते
कुठल्या दारी जन्म झिजवणे तुलाच जमते

कुणी करो अवहेलना तुझी जरी कितीही
नात्यांना तळहाती जपणे तुलाच जमते

केवळ देणे माहित असते तुझ्या मनाला
दुसऱ्यांसाठी सदैव झिजणे तुलाच जमते

दुर्गा दुर्गेश्वरी भवानी तुझीच नावे
दास्यत्व कधी उरी पचवणे तुलाच जमते

प्रत्येकाच्या अस्तित्वाचे कारण तू पण
अस्तित्वाशी तुझ्या झगडणे तुलाच जमते

झालीस कधी माय जिजाऊ अन् सावित्री
निरांजनीची ज्योत फुलवणे तुलाच जमते

खुडल्यात कुणी कच्च्या कलिका कुणी जाळले
तुळस दारची तरी फुलवणे तुलाच जमते

किती हरवल्या गर्दीमध्ये मीरा राधा
एकांताला कृष्ण समजणे तुलाच जमते."

**कवि : साईनाथ फुसे**
**मो. ९४२०४८२०७६**

# हे बदलते स्त्रिये..

साऱ्या जगात आता डंका तुझाच वाजे,
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे..

हुंदके देऊन हृदयी सहन केल्या वेदना,
ऐकली नाही कुणीही या मनीची याचना,
भावना मेल्या करोडो निघले किती जनाजे|1|
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे...

शब्दही निस्तेज झाले आप्त सारे क्रूर झाले,
हवा आधार जयांचा ते सारेच फितूर झाले,
देवही निष्ठूर बनले नाम स्मरू कुणाचे|2|
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे..

छळले तुला जगाने तू शांत मौन धरले,
राक्षसांच्या सावाल्यांनी पुरते तुला घेरले,
अन्याय फार झाला तू तोडलेस फासे|3|
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे..

तू ध्येयवान झाली,कर्तृत्ववान झाली
पूर्वी पिछाडलेली ती स्त्री पुढे आली
तोडून बंधने तू प्रगतीकडे निघाली
हातात घेऊन तू त्या दिव्य यश मशाली,
कीर्ती तुझ्या यशाची विश्वामध्ये विराजे|4|
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे..

तू कल्पना, तू सायना, तू गणकोकीळा बनली,
पण समाज हा आंधळात्याला ना स्त्री समजली,
निर्भयाची ती व्यथा का रोज रोज गाजे? ||5||
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे...

हे समाजा तू स्त्रियांना खेचू नकोस मागे,
तू पूजिलेस नेहमी ते पाय जिजाऊंचे,
स्त्रीनेच घडविले होते थोर शिवाजी राजे|6|
हे बदलते स्त्रिये घे लाखो सलाम माझे..

**कवि - गिरीश शाम जोशी**
औरंगाबाद

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ मार्च २०२५

# स्त्रीयांनी आपल्या कर्तुत्व, त्यागाने जगाला नवी दिशा दिली : सौ. शिल्पाताई अशोक गरुड



स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते. अनादी काळापासून स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने आणि प्रेमाने जगाला नवी दिशा दिली आहे.

आज आपण राजमाता जिजाऊ, इंदिरा गांधी, कल्पना चावला, मदर टेरेसा, सावित्रीबाई फुले, त्यागमाता रमाई, अहिल्याबाई, झाशीची राणी, संत जनाबाई, कवियत्री बहिणाबाई, बीजमाता राहीबाई पोपरे, यांच्यासारख्या कर्तृत्वान महिलांना आदराने स्मरण करतो. त्यांनी आपल्या कार्यांनी समाजात मोलाचे योगदान दिले आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत.

वार नाही तलवार आहे, ती समशेरीची धार आहे, स्त्री म्हणजे अबला नाही, ती तर धगधगती अंगार आहे महिला म्हणजे केवळ शक्ती नाही, तर ती करुणा आणि प्रेमाचा झरा आहे. आजच्या काळात महिलांनी आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढा देणे गरजेचे आहे.

स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरपणा आणि प्रेरणा! ती एक आई आहे, जी संपूर्ण आयुष्यभर आपल्या मुलांसाठी झटते. ती एक बहिण आहे, जी कायम आपल्या भावाच्या पाठीशी उभी असते. ती एक पत्नी आहे, जिला आपल्या जोडीदाराच्या सुख-दुःखाची चिंता असते. आणि ती एक मुलगी आहे, जिला कुटुंबासाठी काहीही करण्याची जिद्द असते. म्हणतात ना, प्रत्येक पुरुषाच्या यशामागे एका स्त्रीचा हात असतो, संसाराच्या गाड्यातील एक महत्वाचे चाक असते आणि ही गोष्ट खरीच आहे. आई, बहीण, पत्नी, मैत्रीण किंवा सहकारी—स्त्री आपल्या विविध भूमिकांतून आपल्या आयुष्याला दिशा देते, पाठिंबा देते. पूर्वीच्या काळी स्त्रियांना केवळ 'चूल आणि मूल' या मर्यादेत पाहिले जात असे.

मात्र, आजच्या काळात स्त्रिया कुटुंब सांभाळण्यासोबतच शिक्षण, व्यवसाय, संशोधन, प्रशासन अशा सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. त्या केवळ घराचे घरपण जपत नाहीत, तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे आजचा दिवस केवळ त्यांचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याचा आहे!नव्या युगात वाहिले वारे स्त्री मुक्तीचे ! संघर्ष पदोपदी केला अन् मिळविले जे न्याय्य हक्काचे !!.हर क्षेत्रात स्थान मिळविले अव्वल दर्जाचे ! स्त्रीचा सन्मान करणे हेच खरे लक्षण पुरुषार्थाचे !? पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री- एक उदाहरण म्हणजे जगभरच्या स्त्रियांना शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नव्हता आणि या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या.आपल्या घरापासून ते देशाच्या विकासामध्येही महिलांचे मोठे योगदान आहे. म्हणून प्रत्येक आपापल्या पद्धतीने महिलांप्रति आदर व्यक्त करतो.

नभी झेपवणारी तू पक्षीनी, सक्षम कर्तव्य दक्ष तू गृहिणी, प्रसंगी कडाडणारी तू सौदामिनी, शत्रूस धूळ चारणारी तू रणरागिणी-

**सौ. शिल्पाताई अशोक गरुड,**
मा. जिल्हा परिषद सदस्या घाटनांद्रा गट

# जागतिक महिला दिन आणि आजची स्त्री

जागतिक महिला दिन दरवर्षी ८ मार्च रोजी संपूर्ण जगभर साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि महिलांच्या हक्कांसाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. महिलांनी इतिहासभर विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आजही, महिला समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

आजच्या युगात स्त्री शिक्षण, व्यवसाय, राजकारण, विज्ञान, क्रीडा, तंत्रज्ञान आणि प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वाटचाल करत आहे. तरीही, काही आव्हाने आजही कायम आहेत. महिला सक्षमीकरण, समान संधी, सुरक्षितता, लिंगभेद नष्ट करणे यांसारख्या मुद्द्यांवर अजूनही काम करण्याची आवश्यकता आहे.

जागतिक महिला दिन हा दिवस साजरा करण्याची सुरुवात १९०८ साली न्यूयॉर्कमध्ये झाली, जेव्हा कामगार महिलांनी आपल्या हक्कांसाठी निदर्शने केली. १९१० साली कोपनहेगन येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत "क्लारा झेटकिन" यांनी जागतिक महिला दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला.

पुढे, १९१७ मध्ये रशियामध्ये महिलांनी समानतेसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले आणि त्याला यशही मिळाले. १९७७ साली संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) अधिकृतपणे ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून घोषित केला. जागतिक महिला दिन साजरा करण्यामागचा उद्देश पुढीलप्रमाणे 1. महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन देणे .2. समान संधी आणि समान हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे3. महिलांच्या यशाचा सन्मान करणे आणि त्यांच्या संघर्षांना वाचा फोडणे4. लिंगभेद दूर करून न्याय्य समाजाची निर्मिती करणेआजची स्त्री – आत्मनिर्भरतेची ओळखआजच्या काळातील स्त्री ही सक्षम, आत्मनिर्भर आणि जागरूक आहे.

शिक्षण आणि आधुनिकतेच्या प्रभावामुळे स्त्री आता केवळ घरापुरती मर्यादित न राहता व्यवसाय, राजकारण, संशोधन, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत आपले स्थान निर्माण करत आहे. काही महत्त्वाच्या क्षेत्रांतील महिलांचे योगदान १. शिक्षण क्षेत्रातील योगदान सावित्रीबाई फुले यांनी भारतातील महिलांसाठी शिक्षणाचे दार खुले केले.आजच्या काळात कल्पना चावला, किरण बेदी, सुधा मूर्ती यांसारख्या स्त्रिया शिक्षण व समाजसेवेच्या माध्यमातून प्रेरणा देत आहेत.२. व्यवसाय आणि उद्योजकतेतील भूमिकाआज महिला स्वतःचे स्टार्टअप्स आणि कंपन्या सुरू करून जागतिक स्तरावर नाव कमवत आहेत.फाल्गुनी नायर (Nykaa), किरण मुझुमदार शॉ (Biocon), वंदना लुथ्रा (VLCC) या महिलांनी आपले स्वतंत्र साम्राज्य उभे केले आहे.३. राजकारण आणि समाजसेवा

इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, ममता बॅनर्जी, निर्मला सीतारामन या महिलांनी राजकारणात मोठे योगदान दिले आहे.महिलांची संसद आणि प्रशासनातील संख्या वाढत आहे, जी एक सकारात्मक गोष्ट आहे.४. विज्ञान आणि

तंत्रज्ञानातील सहभाग : इस्रोच्या "चांद्रयान-३" मोहिमेत महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली.५. क्रीडा क्षेत्रातील यश सायना नेहवाल, पी.व्ही. सिंधू, मिताली राज, मेरी कोम यांसारख्या खेळाडूंनी जागतिक पातळीवर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. स्त्रीसमोरील आव्हानेस्त्रिया जरी प्रगती करत असल्या तरीही त्यांच्यासमोर अजूनही अनेक समस्या आहेत:1. लैंगिक भेदभाव आणि समान संधींचा अभाव 2. महिला सुरक्षेचा प्रश्न (अत्याचार, छळ, घरगुती हिंसा)3. वेतन असमानता (कामाच्या तुलनेत कमी वेतन)4. शिक्षण आणि आरोग्य सेवांचा अभाव (खासकरून ग्रामीण भागात)

या समस्या सोडवण्यासाठी सरकार आणि समाजाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. महिलांना सुरक्षित वातावरण, आर्थिक मदत, उच्च शिक्षण, आणि समान हक्क मिळाले तरच त्यांची खरी प्रगती होईल.महिला सशक्तीकरणाचे उपायमहिलांना सक्षम करण्यासाठी खालील उपाय महत्त्वाचे ठरू शकतात:1. शिक्षणावर भर द्यावा – शिक्षण हे महिलांसाठी सर्वात मोठे हत्यार आहे.2. स्वतःचा व्यवसाय आणि आर्थिक स्वावलंबन – महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे गरजेचे आहे.3. महिला सुरक्षेचे कडक कायदे आणि अंमलबजावणी – गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कायदे हवेत.4. समान संधी आणि वेतन – महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी आणि योग्य वेतन मिळायला हवे.5. लिंग समानतेसाठी समाजाची मानसिकता बदलणे – महिलांकडे संकुचित दृष्टीकोनाने पाहण्याची प्रवृत्ती बदलणे आवश्यक आहे.आजची स्त्री ही साक्षर, सक्षम आणि आत्मनिर्भर आहे.

महिलांचे योगदान केवळ कुटुंबापुरते मर्यादित न राहता आता देशाच्या आणि समाजाच्या विकासात मोठी भूमिका बजावत आहे.महिला दिन केवळ एक सण म्हणून न साजरा करता, तो महिलांच्या समानतेचा संदेश देणारा दिवस असायला हवा. प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील स्त्रियांना प्रोत्साहन द्यावे, त्यांचे कार्य ओळखावे आणि त्यांना पुढे जाण्यासाठी मदत करावी."एका सशक्त स्त्रीमुळे एक सशक्त समाज घडतो आणि त्या समाजामुळे एक प्रगतशील राष्ट्र उभे राहते!"



**लेखन**
**कु. कांबळे कल्पना बापूराव**
पीएच .डी . संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग ,
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर